भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांच्या आस्थापनेवरील एकूण १३ अस्थायी पदांना दिनांक १.३.२०१९ पासून दिनांक ३०.९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- आरपीए-२०१९/प्र.क्र.५६/र-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १२ मार्च, २०१९

संदर्भ :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दि.२०.१२.२०१६.
२) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दि.५.३.२०१८
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-२०१८/प्र.क्र.१३६/र-१, दि.१९.४.२०१८
४) निबंधक, महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण,नागपूर यांचे पत्र क्रमांक आस्था/ कार्या.क्र.१/२०१९/१८, दि.८.२.२०१९
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.२१.२.२०१९

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने "भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ " हा नवीन अधिनियम भूमीसंपादन व पुनर्वसन यासाठी एकत्रितपणे पारित केला आहे. अधिनियमातील कलम ५१ नुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.२०.१२.२०१६ अन्वये भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून एकूण १३ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

२. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२१.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ठ असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.१.३.२०१९ ते दि.३०.९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन भूमीसंपादन,पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांच्या आस्थापनेवरील एकूण १३ अस्थायी पदांना वरील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

भूमीसंपादन,पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांच्या आस्थापनेवरील एकूण १३ अस्थायी पदांना **दिनांक १.३.२०१९ ते ३०.९.२०१९** (७ महिने पर्यंत) या कालावधीसाठी वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२१.२.२०१९ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांवर होणारा खर्च मागणी क्र. सी-५, लेखाशिर्ष २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०१- पुनर्वसन, २०२ इतर पुनर्वसन योजना, (०३) प्रकल्प बाधित व्यक्तीची पुनर्वसाहत, (०३) (०९) भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण (२२३५ सी०६३) या लेखाशिर्षाखालील सन २०१८-१९ च्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.५/३/२०१८ च्या शासन निर्णयात दरम्यानच्या काळात सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे तसेच यानंतर सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याकरिता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही,याची सर्व विभागांनी नोंद घेण्याबाबत वित्त विभागाने निर्देशित केले आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय,वित्तविभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दिनांक २१.२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१३१६०१५३३६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0dbd15a4cda43063e726a7e4b0f366443319057727eda4431c6e339fb479ef33, cn=Shivaji P Karwar
Date: 2019.03.13 16:05:12 +05'30'

(शि.पां.कारवार)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

१) विभागीय आयुक्त् कार्यालय, नागपूर
२) निबंधक (तहसिलदार), भूमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर
३) महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र, नागपूर
४) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
५) मा. सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक
६) वित्त विभाग (कार्यासन व्यय-१०/अर्थ-६/आपुक कक्ष), मंत्रालय, मुंबई
७) कार्यासन ब-१,/कार्यासन ई-३ महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
८) र-१ कार्यासन निवडनस्ती.

विवरणपत्र

(शासन निर्णय क्रमांक आरपीए-२०१९/प्र.क्र. ५६ /र-१, दि. १२.०३.२०१९ सोबतचे विवरणपत्र)

भूमीसंपादन,पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांच्या आस्थापनेवरील निर्माण करण्यात आलेल्या एकूण १३ अस्थायी पदांना दि.१.३.२०१९ ते दि.३०.९.२०१९ पर्यंत मुदतवाढ दिलेल्या पदांचा तपशील

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु.)	संख्या
१	पिठासीन अधिकारी (जिल्हा न्यायाधिश) Presiding Officer (District Judge)	५१५५०-१२३०-५८३०-१३८०-६३०७०	१
२.	निबंधक (तहसिलदार) Registrar (Equivalent to Tehsildar cader)	१५६००-३९१०० (ग्रेड पे ५०००)	१
३.	अव्वल कारकून	५२००-२०२०० ग्रेड पे ३५००	२
४.	लघूलेखक	९३००-३४८०० ग्रेड पे ४३००	१
५.	लिपिक	५२००-२०२०० ग्रेड पे १९००	४
६.	वाहन चालक	५२००-२०२०० ग्रेड पे १९००	१
७.	शिपाई	५२००-२०२०० ग्रेड पे १३००	३
	एकूण		**१३**